# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २१४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/०४/२०१८

**१) चारचाकी वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे एकाचा मृत्यु :-**

दिनांक २४/०४/२०१८ चे ०७.२० वाजता. दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहणाने यातील मृतक अनिल झोडापे याचे दुचाकी मोटार सायकल क्र. एम. एच. ३४/एजी १०२५ ला धडक मारुन दुचाकी चालकास गंभिर जखमी केल्याने त्यास धडक मारुन त्याचे वाहण घेवुन पळुन गेला जखमीस औषधोपचाराकरीता ग्रा. रु. पवनी येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने प्रत्यक्षदर्शी फिर्यादी प्रणित धृवलाल झोडपे वय १६ वर्ष, रा. भेंडाळा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३०४(अ) भांदवि. सहकलम १८४,१३४,१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोउपनि. डहाके पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) बसच्या धडकेत एकाचा मृत्यु :-**

दिनांक २४/०४/२०१८ चे १६.०० वाजता. दरम्यान यातील मृतक अमोल रामचंद्र मेश्राम वय २७ वर्ष, रा. सावरी हा टाटा मॅजीक गाडी क्र. एमएच ४० एन ७०५९ चा चालक हा त्याचे गाडी घेवुन पेट्रोल पंप ठाणा वरुन भंडारा कडे जात असतांना फुलमोगरा येथे येवुन एनएच ६ रोडचे बाजुला प्रवाशांची वाट पाहत ऊभा असतांना यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील बस भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवत आणुन टाटा मॅजीकला मागेहुन धडक दिली असता टाटा मॅजीकचा चालक हा खाली रोडवर पडून डोक्याला मार लागुन मरण पावला यातील आरोपी हा टाटा मॅजीकच्या मालकाचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यशंवत ज्ञानेश्वर तिजारे वय ४३ वर्ष, रा. हनुमान वार्ड पेट्रोलपंप ठाणा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३०४(अ) भांदवि. सहकलम १३४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. मेश्राम पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) संगनमत करुन विवाहीतेला शारीरिक व मानसीक त्रास दिल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक १०/०७/२०१७ चे १ महिण्या नंतर पासुन आज पावेतो. यातील फिर्यादीची मुलगी ही मुकबधिर असुन आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे मुलीस घरचे कामधंदे बरोबर करीत नाही या कारणावरुन काठीने व थापड बुक्यांनी मारपीट करुन शारीरिक व मानसीक त्रास दिल्याने फिर्यादीचे तोंडी व महिला समुपदेशक केन्द्र तुमसर यांचे अहवाला वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४९८(अ),३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोउपनि. मेसरे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**४) मोटार सायकलची चोरी :-**

दिनांक २४/०४/२०१८ चे ०४.०० वाजता ते ०५.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची हिरो होंडा मोटार सायकल क्रमांक एमएच ३६ ए ४२८१ किंमती २०,५००/-रु. ची कोणीतरी अज्ञात चोरोन हरीचंद्र भोयर रा. यांचे घरासमोरुन चोरुन नेल्याने फिर्यादी सचिन गोवर्धन वैद्य वय ३० वर्ष, रा. बोथली यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बावणे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**५) टाटा लॉगर मार्कर स्पेस व गोल्डी ग्रे पॅनलची चोरी :-**

दिनांक २२/०४/२०१८ चे १७.०० ते २४/०४/२०१८ चे १४.०० यातील फिर्यादी फिल्ड ऑफीसर यांनी नमुद घटणा वेळी ठिकाणी बेला हद्दीतील लावलेला स्वयम चलीत हवामान यंत्र तपासले असता त्यामधील टाटा लॉगर मार्कर स्पेस कंपनीचा किंमती १२,०५० /-रु. ची गोल्डी ग्रे कंपीनचा सोलर पॅनल किंमती ४,०००/-रु. असा एकुण १६,०५०/-रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने नेल्याने फिर्यादी अनिल श्रीराम वाढीले वय २७ वर्ष, रा. लोहारा जि. गोंदिया यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. घरडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

६) संगनमत करुन अश्लिल शब्दात बोलुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २४/०४/२०१८ चे १६.०० यातील चुल्हाड मामा तलावाचे गाळ उपसण्याचे काम चालु असतांनी यातील आरोपीतांनी संगमत करुन ग्राम पंचायत संदस्य यांच्या बायकांना, आईना अश्लिल शब्दात बोलुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २९४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

७) तरुणाचा मृत्यु :–

दिंनाक २३/०४/२०१८ चे १७.४५ वाजता दरम्यान यातील मृतक प्रमोद जिवन शरणागत वय २० वर्ष रा. उसरला यास दिनांक २३/०४/२०१८ चे १७.४५ सु. बो दवाखाना तुमसर येथे मृत अवस्थेत आणले असता तेथील डॉक्टरांनी चेक करुन मृत घोषीत केल्याने डॉक्टरी मेमो पो. स्टे ला प्राप्त झाल्याने व मृतक भावाचे बयाना वरुन व सरतर्फे फिर्यादी पोहवा. सरोदे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुरले पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत

८) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २२/०४/२०१८ चे २२.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील काळी पिवळी वाहन सिहोरा बसस्टॉप येथे सार्वजनीक रोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत उभी करुन मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोना. सार्वे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. सार्वे पोलीस स्टेशन कारधा करीत आहेत.

९) अवैध दारु /जुगार अडड्यांवर धाडी . :–

दिनांक २४/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन जवाहरनगर, मोहाडी, कारधा, वरठी, तुमसर, सिहोरा, आंधळगाव, साकोली, पवनी व लाखांदुर येथे अवैध हातभट्टी +देशी दारू/जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण १४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४६६ लिटर हातभंट्टी दारू + २२२० किलो सडवा मोहा किंमती १,३५,२८०/रु. व ६५ लिटर ४३० मिली लिटर देशी दारु किंमती २३,३८७/–रु. तसेच जुगारातुन ४६०/रु. असा एकुण किंमती १, ५९,१२७/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २४/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक– ०२ तीन सिटर वाहनाकरीता– ०९ ईतर वाहनांवरती – १०५ केसेस करण्यात आले आहे.

(सपोनि. एच. एन. रायपुरे)
पोलीस नियत्रंण कक्ष
भंडारा
दुरध्वनी.क्र.९९७०७३२०७९

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.